# 'डीएमआरसी' करणार मेट्रो-३चे संचालन

## आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेनंतर कंत्राट

मुंबई, ता. २६ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) मुंबईतील पहिल्या पूर्णतः भूमिगत असलेल्या मेट्रो-३च्या (कुलाबा-वांद्रे-सीप्झ) संचालन आणि देखभालीचे कंत्राट दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडला (डीएमआरसी) दिले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेनंतर हे कंत्राट त्यांना देण्यात आले. डीएमआरसीने सर्वात कमी बोली लावून हे कंत्राट मिळवले आहे.

भारतातील मेट्रो रेल्वे क्षेत्रात अग्रस्थानी असलेल्या डीएमआरसीने दोन दशकांहून अधिक काळ दिल्ली मेट्रो अंतर्गत विविध मेट्रो मार्गांचे यशस्वी संचालन व देखभाल केली आहे. या कराराचा कालावधी १० वर्षे असून याअंतर्गत डीएमआरसी मेट्रो-३ चे संचालन नियंत्रण केंद्रे, डेपो नियंत्रण केंद्र व स्थानके यांचे व्यवस्थापन, तसेच सर्व गाड्या व मेट्रो प्रणालीच्या सर्व पायाभूत सुविधांची देखभाल आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करणे याचीही जबाबदारी पार पाडणार आहे.

दरम्यान, एमएमआरसी मेट्रो रेल्वे प्राधिकरण म्हणून कर्तव्य पार पाडेल. तसेच महसूल व्यवस्थापन, मल्टिमॉडल इंटिग्रेशन, व्यवसाय व ब्रँड व्यवस्थापन, जनसंपर्क, कायदेविषयक बाबी, नॉन-फेअर बॉक्स महसूल निर्मिती, सेवा कर्ज, देयके आणि नियामक मंडळांशी समन्वय आदी जबाबदारीही एमएमआरसीकडे असेल. कोणत्याही मेट्रोसाठी संचालन आणि देखरेख हा महत्त्वाचा घटक असतो. आम्ही प्रवाशांना परवडणाऱ्या दरात, आरामदायक, सुरक्षित, विश्वासार्ह आणि उच्च दर्जाची सेवा देण्यास कटिबद्ध आहोत, असे एमएमआरसीच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे म्हणाल्या.